दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.
RNI No.MAHMAR/2019/79184
www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २९३ वा | शनिवार दि. १९ ऑगस्ट २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## नाशिक जिल्ह्यात आयटी हब उभारणार :उद्योगमंत्री



**नाशिक।** दिंडोरी तालुक्यातील अक्राळे येथे शंभर एकर जागेवर आयटी हब उभारले जाणार आहे. पायाभूत सुविधांसह आयटी पार्क तयार झाल्यास, आयटी पॉलिसीमध्ये ज्या काही तरतुदी आहेत त्या नाशिकला उपयुक्त ठरतील. नाशिकमध्ये मोठा प्रकल्प आणण्यासाठी सध्या आम्ही चर्चा करीत आहोत. ट्रक टर्मिनलबाबत देखील आमचे प्रयत्न सुरू असून, त्यासाठी महापालिकेने पुढाकार घ्यावा की एमआयडीसीने हे ठरवून घेण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

### न्यूज कॉलम

#### छडवेलात दोन गटात वाद; गुन्हा दाखल

**धुळे ।** साक्री तालुक्यातील छडवेल पखरुण गावात मागील भांडणाच्या कारणातून दोन गटात वाद झाला. या वादातून परस्परांना मारहाण करण्यात आली. या प्रकरणी परस्पर विरोधी तक्रारीवरून दोन्ही गटाच्या ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मुकेश नाना पवार या तरुणाने तक्रार दिली आहे. त्यानुसार मागील भांडणाच्या कारणावरून करण हिंमत मोरे, नितीन शिवाजी मोरे, योगेश दगडू सोनवणे, हिंमत शिवाजी मोरे यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. दुसऱ्या गटातर्फे हिंमत शिवाजी मोरे याने तक्रार दिली आहे. त्यावरून संतोष अर्जुन सोनवणे, तुषार नाना पवार, मुकेश नाना पवार, पीतांबर रामा मालचे यांनी मारहाण केली.

#### चांदगड शिवारात मेंढपाळाला मारहाण

**धुळे ।** शिंदखेडा तालुक्यातील चांदगड शिवारात मेंढ्या चारण्याच्या कारणावरून पांडू तुकाराम ठेलारी ( वय ३८, रा. सोंडले) यांना संतोष भाईदास कोळी, गणेश संतोष कोळी, राहुल मोतीलाल कोळी व अन्य एकाने काठ्यांनी मारहाण केली. शिंदखेडा पोलिस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुख्यमंत्री सिनेट निवडणुकीला घाबरले : आदित्य ठाकरेंची टीका

### विरोधक आक्रमक : युवा सेनेच्या पॅनेलचे अर्ज दाखल

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई विद्यापाठीच्या सिनेट निवडणुकीची मोठ्या जोमाने तयारी करत असलेल्या युवासेना आणि मनसेची विद्यार्थी सेनेला मोठा झटका बसला आहे. विद्यापीठाच्या पदवीधर मतदारसंघाची सिनेट निवडणूक 'पुढील आदेश' येईपर्यंत विद्यापीठाने स्थगित करण्याचा निर्णय घेतलाय. शासनाच्या या निर्णयावर युवासेनाध्यक्ष आदित्य ठाकरे तसेच मनविसे अध्यक्ष अमित ठाकरे यांनी संताप व्यक्त केला आहे. ही निवडणूक युवासेना मोठ्या फरकाने जिंकणार होती, म्हणूनच सत्ताधाऱ्यांनी निवडणूक स्थगित केली, असा दावा आदित्य ठाकरे यांनी केला. तर विद्यापीठ प्रशासन नेमकं कुणाला घाबरतंय? असा सवाल अमित ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांना विचारलं.

मुंबई विद्यापीठाच्या पदवीधर मतदारसंघाची सिनेट निवडणूक 'पुढील आदेश' येईपर्यंत विद्यापीठाने स्थगित करणं अत्यंत धक्कादायक आणि अशोभनीय आहे. ही निवडणूक लढवू इच्छिणारे नोंदणीकृत पदवीधर उमेदवार आज (शुक्रवार दि. १८ ऑगस्ट) सकाळी आपले उमेदवारी अर्ज विद्यापीठात दाखल करणार होते. मात्र केवळ १२ तास आधी, काल रात्री ११च्या सुमारास विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. सुनील भिरुड यांनी कालच्या शासन पत्राचा संदर्भ देऊन, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या कालच्याच बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार ही निवडणूक स्थगित केल्याचं जाहीर केलं. अत्यंत संतापजनक बाब म्हणजे, नेमक्या कोणत्या कारणाने निवडणूक रद्द करण्यात आली हे नमूद करण्याची पारदर्शकता दाखवणेही विद्यापीठाच्या कुलसचिवांना गरजेचे वाटले नाही.



**शेलारांनी पत्र देऊन निवडणुकीला स्थगिती मिळवली : वरुण सरदेसाई**

मला वाटतं हा विषय आता शासन आणि विद्यापीठाचा आहे. अनेक संघटना या निवडणुकांसाठी इच्छूक आहेत. प्रचंड गोंधळ कालच्या पत्रकामुळे झालेला आहे. येत्या १० दिवसांत निवडणुका होतील, अशी खात्री आहे आणि नाही झाल्या तर कुलगुरुंनी पीसी घेऊन स्पष्टता द्यावी. दरम्यान, अमित ठाकरे यांचीही ही पहिलीच निवडणूक होती. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाचीही कसोटी लागणार होती. मात्र, विद्यापीठाने निवडणुकीला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे विद्यार्थी संघटनेत आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. भाजप-शिंदे गटातील तयारी अपूरी पडल्यामुळे हा निर्णय झाला का? अशी चर्चा रंगली आहे.

**कोणत्या कारणाने निवडणूक रद्द?**

मात्र, केवळ १२ तास आधी, काल रात्री ११ च्या सुमारास विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. सुनील भिरुड यांनी कालच्या शासन पत्राचा संदर्भ देऊन, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या कालच्याच बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार ही निवडणूक स्थगित केल्याचं जाहीर केलं. अत्यंत संतापजनक बाब म्हणजे, नेमक्या कोणत्या कारणाने निवडणूक रद्द करण्यात आली, हे नमूद करण्याची पारदर्शकता दाखवणेही विद्यापीठाच्या कुलसचिवांना गरजेचे वाटले नाही, असे अमित ठाकरेंनी म्हटलं.

**सिनेट तुमचे सरकार पाडणार नाही**

दोन पक्ष फोडले, दोन परिवार फोडले. महाशक्ती सोबत असून निवडणुकीला घाबरतात का? लोकसभेला देखील असेच करण्याची शक्यता आहे. लोकसभेला देखील निवडणुका जाहीर करतील आणि मग स्थगित करतील. सिनेट तुमचे सरकार पाडणार नाही तुमचे सरकार तर आम्हीच पाडणार आहोत. त्यांची तयारी पूर्ण आहे की नाही माहीत नाही पण तयारी नसेल म्हणून असे झाले असेल, असा टोला आदित्या ठाकरेंनी लगावला आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले की, या आधी देखील २०१० मध्ये युवा सेना सिनेटची निवडणूक लढवली होती. त्या वेळी १० पैकी ८ जागांवर विजय मिळवला होता. तर २०१७ मध्ये १० पैकी १० जागा जिंकल्या होत्या. आमचा रिझल्ट हा १०० टक्के होता. आमच्यासमोर सगळेच पक्ष लढत होते, तरीही आम्ही चांगल्या मताधिक्क्याने विजय मिळवला होता, असा दावा आदित्य ठाकरे यांनी केला आहे.

विद्यापीठाने काढलेल्या परिपत्रकात बैठकीत ठरल्याप्रमाणे निवडणूक कार्यक्रम स्थगित करण्यात आल्याचे म्हटले आहे. यावरुनही आदित्य ठाकरे यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केला आहे. ही बैठक किती वाजता, कुठे झाली? बैठकीचे मेरीट्स काय आहेत? असेही प्रश्न आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केले आहेत. विद्यापीठ निवडणुकीला सामोरे जायला घाबरत असतील, तर समजायच काय? एवढी फोडाफोड केली. दोन पक्ष फोडले, परिवार फोडला. महाशक्ती स्थापन केलीय. स्वत: मुख्यमंत्री, दोन भारदस्त उपमुख्यमंत्री सोबतीला. ही महाशक्ती सोबत असून मुंबई विद्यापीठामध्ये सरकार निवडणूक घेऊ शकत नसेल, तर काय उपयोग? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

# मूलभूत सोयी सुविधांच्या कामांसाठी पाच कोटी १५ लाखांच्या निधीला मंजूरी

### खा. हेमंत गोडसे यांच्या प्रयत्नांना यश

**नाशिक । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील गावांना मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी खा. हेमंत गोडसे यांच्याकडून सुरू असलेल्या सततच्या प्रयत्नांना यश आले आहे. लेखाशीर्ष २५१५-१२३८ या अंतर्गत शासनाने नाशिक लोकसभा मतदारसंघातील ३५ गावांना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ५ कोटी १५ लाख रूपयांच्या निधीला मान्यता दिली आहे. यामध्ये नाशिक तालुक्यातील २०, सिन्नर तालुक्यातील ६, इगतपुरी तालुक्यातील ७, तर त्र्यंबकेश्वर तालुक्यातील २ या गावांचा समावेश आहे. या सर्व गावांमध्ये सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रत्यक्ष कामांना येत्या काही दिवसात प्रारंभ होणार असल्याची माहिती खा. गोडसे यांनी दिली आहे.

नाशिक, इगतपुरी, त्र्यंबकेश्ववर व सिन्नर या तालुक्यांमधील ग्रामीण भागातील गावांना मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून द्यावी यासाठी गेल्या काही महिन्यांपासून विविध गावांच्या ग्रामस्थांकडून खा. हेमंत गोडसे यांच्याकडे मागणी होत होती. ग्रामीण भागातील गावकऱ्यांच्या मागणीची गंभीर दखल घेत सोयी सुविधांच्या कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी खा. हेमंत गोडसे यांनी शासन दरबारी प्रयत्न सुरू केले होते. खा. गोडसे यांची मागणी न्यायिक असल्याने त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.



लेखाशीर्ष २५१५-१२३८ या अंतर्गत शासनाने नाशिक लोकसभा मतदारसंघातील ३५ गावांना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ५ कोटी १५ लाख रूपयांच्या निधीला मान्यता दिली आहे. या मिळालेल्या मान्यतेत कामाचे स्वरूप - सभामंडप (डोम) बांधणे, सामाजिक सभागृह बांधणे, तसेच गावांतर्गत रस्ते काँक्रिटीकरण करणे असे आहे.

शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधीतून नाशिक तालुक्यातील - रायगडनगर, धोंडेगाव, पळसे, कालवी, बाभळेश्वर, लाखलगाव, शिंदे, लहवीत, वंजारवाडी, उंबरकोन, बेलगाव ढगा, मातोरी, शेवगेदारणा, पाथरे खुर्द, कोटमगाव, माडसांगवी, सामनगाव, दोनवाडे, गोवर्धन, जामगाव. इगतपुरी तालुक्यातील- टाकेद खुर्द, ओंडली, नागोसली, कवडदरा, घोटी बु, नांदुरवैद्य, नांदडगाव. सिन्नर तालुक्यातील- आडवाडी, घोरवड, दातली, हिवरगाव, वडांगळी, खापराळे. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील- वेळुंजे, तळेगाव (अं) हे गाव समाविष्ट आहेत.

# कोरोना काळात वाहनांचा वापर घटला असतानाही ९० लाखांचे डिझेल खरेदी

### नगरसेवकांच्या आरोपानंतर चौकशीचे आदेश

**धुळे । प्रतिनिधी**

मनपाच्या वाहन विभागात अनागोंदी सुरू आहे. या विभागात डिझेल खरेदीत घोटाळा झाला आहे. त्यामुळे डिझेल खरेदीचे मागील तीन वर्षांचे इंधन लॉकबुक तपासावे. कोरोना काळात वाहनांचा वापर कमी असताना ९० लाख रुपये डिझेल खरेदीवर खर्च झाले. वाहन विभाग प्रमुख प्रत्येक वेळा स्वत: पेट्रोल पंपावर जाण्याचे कारण काय, वाहनाऐवजी बॅरेलमध्ये इंधन भरतानाचे व्हिडिओ आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी नगरसेवक सुनील बैसाणे यांनी मनपा स्थायी समितीच्या सभेत केली. त्यावर सभापती किरण कुलेवार यांनी चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. तसेच लेखा परीक्षण करण्याची सूचना केली.



मनपा सभागृहात ही सभा झाली. या वेळी उपायुक्त विजय सनेर, नगरसचिव मनोज वाघ उपस्थित होते. नगरसेवक सुनील बैसाणे म्हणाले की, महापालिकेत परिवहन समिती नाही. मनपाच्या वाहन विभागाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होते आहे. भंगार वाहनांचा अद्याप लिलाव झालेला नाही. सन २०२१ ते २०२३ या तीन वर्षांत २०२१-२२ मध्ये डिझेल खरेदीवर जास्त खर्च झाला आहे. कोरोना काळात डिझेल खरेदीवर ९० लाख रुपये खर्च झाले. या काळात लॉकडाऊन असल्याने वाहनांचा वापर कमी होता. त्यामुळे चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली. सभापती किरण कुलेवार यांनी चौकशीचे आदेश दिले.

अतिक्रमण विषयावर घेणार बैठक शहरातील मुख्य रस्त्यावर अतिक्रमण वाढले असून, हा प्रश्न साडेचार वर्षांनंतरही सुटलेला नाही. पारोळा रस्त्यावर विक्रेते दुकान थाटून बसतात. त्यामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी होते. साक्री रोडवरही अतिक्रमण वाढते आहे. त्यामुळे प्रशासनाने कारवाई करणे आवश्यक आहे. मात्र, प्रत्येक वेळी पोलिस बंदोबस्ताची अडचण सांगितली जाते, असा आरोप नगरसेवक हर्ष रेलन यांनी केला. त्यावर सभापती किरण कुलेवार यांनी या विषयी स्वतंत्र बैठक घेणार असल्याचे स्पष्ट केले.

# सिव्हिल इंजिनिअर तरुणीची नदीत उडी घेवून आत्महत्या

### मच्छीमारांना पाण्यात तरंगतांना आढळला मृतदेह

**धुळे । प्रतिनिधी**

तापी नदीवरील सावळदे पुलावरून उडी घेऊन तरुणीने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. नदीत मासेमारी करणाऱ्यांना या तरुणीचा मृतदेह पाण्यात तरंगतांना आढळून आल्यानं हि घटना समोर आली आहे. दरम्यान पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या आदेशानंतरही जिल्हा प्रशासन सुस्त असल्यामुळे सावळदे पुलावरील आत्महत्यांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही.

शिरपूर येथील तापी नदीवरील सावळदे पूल हा मृत्यूचा सापळा बनला असून या ठिकाणी दिवसागणिक आत्महत्या करणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. धुळे येथील २४ वर्षीय तरुणीने देखील या सावळदे पुलावरून उडी घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे. सिव्हिल इंजीनियरिंग पूर्ण केलेल्या या उच्चशिक्षित तरुणीने हे टोकाचे पाऊल का उचललं? याबाबत अद्यापही कारण स्पष्ट होऊ शकले नाही. तरी दुपारच्या सुमारास अचानक या तरुणीचा मृतदेह परिसरातील मच्छीमारांना पाण्यावर तरंगताना आढळून आला. मच्छीमारांनी तात्काळ पोलिसांशी संपर्क साधून पोलिसांनी तात्काळ मच्छीमारांच्या मदतीने या तरुणीचा मृतदेह पाण्याबाहेर काढला व त्यानंतर हा मृतदेह शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. पालकमंत्री गिरीश महाजन यांनी महिन्याभरापूर्वी या संदर्भात गांभीर्याने दखल घेण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला दिले होते. तरी देखील याकडे अद्याप जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्यामुळेच आत्महत्या करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत असल्याचा आरोप परिसरातील नागरिकांतर्फे लावण्यात येत आहे.

# विशेष लेखा परीक्षकास पाच लाखांची लाच स्वीकारताना अटक

**धुळे । प्रतिनिधी**

अवसायानात गेलेल्या सावदा येथील पतसंस्थेचा गाळा नावावर करुन देण्याच्या बदल्यात लाचेची मागणी करणारा अवसायक सखाराम ठाकरे जेरबंद झाला आहे. धुळे बस स्थानकात तक्रारदाराकडून पाच लाख स्वीकारताना त्याला रंगेहाथ धरण्यात आले.

याप्रकरणी अधिक माहिती अशी की, जळगाव जिल्ह्यातील सावदा येथे नगरपरिषदेच्या मालकीचे राजे छत्रपती संभाजीराजे व्यापारी संकुल आहे. त्याठिकाणी अवसायानात निघालेली श्री महालक्ष्मी सहकारी नागरी पतसंस्थेचे कार्यालय होते. तो गाळा तक्रारदार यांना घ्यायचा असल्याने त्यांनी पतसंस्थेचे तत्कालीन प्रशासक अशोक बागुल यांच्या सांगण्यावरून ३ लाख ८५ हजार रुपयांचा रोखीने भरणा केला. तेव्हा ताबा पावती व प्रतिज्ञापत्र लिहून देत गाळ्याचा ताबा तक्रारदार यांना देण्यात आला. मात्र, भरलेली



अनामत रक्कम नगरपरिषदेत नावाने जमा झालेली नसल्याने अशोक बागुल यांना विचारणा केली असता त्यांनी आणखी ३ लाखांची मागणी केली. त्यानंतर बागुल यांची बदली झाली. त्यांच्या जागेवर अवसायक म्हणून सखाराम कडू ठाकरे (रा. राधेय हौसिंग सोसायटी, पाचोरा जि.जळगाव) यांची नियुक्ती झाली. त्यांच्याकडे विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था प्रक्रिया, धुळे यासह जळगावचा अतिरिक्त कार्यभार आहे.

अवसायक ठाकरे यांनाही अनामत रक्कम नावावर करुन देण्यास सांगितले असता त्यांनीही ५ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली. शेवटी वैतागून तक्रारदाराने धुळे एसीबीकडे तक्रार केली. त्यानुसार एसीबीने काल रात्री सापळा रचला. सदर लाचेची रक्कम देण्यासाठी जळगाव येथील रहिवासी असलेल्या तक्रारदाराला धुळे बस स्थानकात बोलविण्यात आले. त्याठिकाणी तक्रारदाराकडून पाच लाखांची रोकड स्वीकारत असतानाच धुळे एसीबीच्या टीमने झडप घालत सखाराम ठाकरे याला जेरबंद केले. त्याच्याविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही कामगिरी पोलीस उपअधिक्षक अभिषेक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, पोनि हेमंत बेंडाळे, पोनि रूपाली खांडवी, पो. हवा. राजन कदम, शरद काटके, पो. शि. संतोष पावरा, रामदास बारेला, गायत्री पाटील, प्रशांत बागुल, प्रवीण पाटील, मकरंद पाटील, चालक पोहवा सुधीर मोरे यांनी पार पाडली.

# फोटोसाठी वाढतेय मुशाफिरी : तरुणाईचा छायाचित्रणाकडे वाढतोय कल

### जागतिक छायाचित्रण दिन

गडकिल्ल्यांची भटकंती असो वा निसर्गरम्य ठिकाणची भटकंती... थंड हवेचे ठिकाण असो वा जंगलातील भटकंती... असे सारे काही आता तरुण छायाचित्रकारांनाही खुणावू लागले आहे. त्यामुळेच आता तरुण छायाचित्रकार मोठ्या प्रमाणात पर्यटन छायाचित्रणाकडे वळले आहेत. १८ ते ३५ वयोगटातील तरुणाई प्रामुख्याने देशविदेशात भटकंती करून तेथील निसर्ग असो वास्तुरचना.... ... असे कित्येक गोष्टींची छायाचित्रे टिपत आहेत. मोबाईलसह डीएसएलआर कॅमेऱ्यावर छायाचित्रे टिपून ते सोशल मीडियावर पोस्ट करतात. त्यांच्या छायाचित्रांना पसंतीही मिळत असून, काहींसाठी पर्यटन छायाचित्रण करिअरचा पर्याय बनला आहे. या पर्यटन छायाचित्रांचे ऑनलाइन- ऑफलाइन प्रदर्शनही भरविले जात आहेत.

**शाळकरीही जोमात**

**सध्या सातवी ते दहावीतील विद्यार्थ्यांना भेट म्हणून पालकांकडूनच डिजिटल कॅमेरा मिळतो. त्यामुळे त्यांच्या आवडीला खतपाणी मिळतं. निसर्गाच्या संबंधित काम करणाऱ्या संस्थांनी आयोजित केलेल्या कॅम्पमध्ये शालेय मुलांचा सहभाग वाढतोय. त्यामुळे ते आपसूकच फोटोग्राफीकडे आकर्षित होतात. या मुलांमध्ये फोटोंविषयीचं विविध तंत्र शिकण्याची ऊर्मीही असते. वन्यजीवांविषयीही ते माहिति मिळवण्याचा प्रयत्न करतात. भलामोठा कॅमेरा, विविध लेन्स आणि ट्रायपॅड हाती घेऊन वाइल्डलाइफ फोटोग्राफीसाठी बाहेर पडण्यात मुलींची संख्याही जास्त आहेत.**



**तरुणाई ठिकठिकाणी फिरायला जात आहे आणि तेथील छायाचित्रे टिपत आहेत. त्यासाठी काहींनी कॅमेरा सेटअपही घेतला असून, महाविद्यालयीन तरुणाईसह नोकरदार तरुणाईही पर्यटन छायाचित्रणाकडे वळली आहे. अनेक सोशल मीडियावर व्यासपीठ, मासिकांसाठी, संकेतस्थळांसाठी छायाचित्रे टिपत आहेत. यातून पर्यटनाचे जग लोकांसमोर मांडण्याचा ते प्रयत्न करीत आहेत.- उमेश पाटील,** छायाचित्रकार

तरुणाई महाराष्ट्रासह केरळ, गोवा, कर्नाटक, गुजरात, राजस्थानसह अमेरिका, ऑस्ट्रेलिया, इटली, मॉरिशिअस, मलेशियात जाऊन ते छायाचित्रणासह विविध प्रकारचे व्हिडिओही बनवत आहेत. सोशल मीडियावर त्यांच्या छायाचित्रांना आणि व्हिडिओला चांगला प्रतिसाद आहे. काही जण तर ट्रॅव्हल कंपन्यांसाठी काम करीत आहेत, तर काही जण सोशल मीडियाच्या वेगवेगळ्या व्यासपीठांसाठी आपली छायाचित्रे देत आहेत. फोटोग्राफीच्या क्षेत्रात सध्या बरंच नवं टॅलेंट दिसू लागलंय. त्यातल्या त्यात नेचर, वाइल्डलाइफ फोटोग्राफीची क्रेझ तरुणांमध्ये वाढत असून, यामधील 'एक्सक्लुझिव्ह' फोटो मिळवण्यासाठी फोटोग्राफर बिनधास्त, बेधडकपणे भटकंती करत आहेत. निसर्ग आणि वन्यजीव फोटोग्राफीसाठी झपाटलेला वर्ग वाढतोय. त्यांची ही प्रतिभा, कौशल्य विविध प्रदर्शनांच्या निमित्तानं समोरही येतं. विशेष म्हणजे, पुण्यातील अपरिचित ठिकाणांचं सौंदर्य, दुर्मिळ वन्यजीव जाती समोर आणण्यासोबतच राज्य आणि भारताबाहेर कितीही कालावधीसाठी जाण्याची त्यांची तयारी आहे. फोटोग्राफीमधील अद्ययावत तंत्रज्ञान आणि परवडणारी उपकरणं यामुळे या छंदाकडे वाढता कल दिसून येतोय. कॉलेजस्तरीय आणि नोकरदार वर्ग आपापल्या सोयीनुसार हा छंद जोपासत आहे.



शोध बातमी
पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

# नाशिकमध्ये वॉकीटॉकीद्वारे फोडला तलाठी परीक्षेचा पेपर

### एक अटकेत, आरोपी छत्रपती संभाजीनगरचा

**नाशिक । प्रतिनिधी**

तलाठी परीक्षेत परीक्षार्थीला वॉकीटॉकीद्वारे बाहेरून उत्तरे पुरवणाऱ्या संशयिताला नाशिकमधील म्हसरूळ येथील केंद्राबाहेर अटक करण्यात आली. गणेश गोसिंगे (रा. छत्रपती संभाजीनगर) असे संशयिताचे नाव आहे. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयिताकडून वॉकीटॉकी, दोन मोबाइल, एक टॅब आणि कानातील सूक्ष्म श्रवणयंत्र जप्त करण्यात आले. एका परीक्षार्थीने त्याच्या छुप्या कॅमेऱ्यातून प्रश्नपत्रिका ब्ल्यूटूथद्वारे हॉलबाहेर पाठवली. बाहेरील संशयिताने अतिसूक्ष्म श्रवणयंत्राच्या मदतीने वॉकीटॉकीद्वारे उमेदवारांना उत्तरे सांगितली.

दरम्यान, प्रशासनाने या प्रकाराची गांभीर्याने दखल घेतली आहे. गैरप्रकाराची चौकशी पोलिसांकडून सुरू असून दोषींवर योग्य ती कारवाई केली जाईल, असे निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांनी सांगितले. संशयिताने किती उमेदवारांना कॉपी पुरवली, राज्यातील इतर शहरातही हे रॅकेट पसरलेले आहे काय, याचा सखोल तपास सुरू असल्याचे पोलिस उपायुक्त किरणकुमार चव्हाण म्हणाले.

## वर्तनातील दुजाभाव हिताचा नाही

माणसे शिकली म्हणजे त्यांचा सर्वांगीण विकास होईल, माणसे विचारशील बनतील आणि त्यांचे सामाजिक भान वाढेल हे थोरामोठ्यांचा विचार खोटा ठरवायचे सामान्य माणसाने ठरवले असावे का? शिक्षणाचा आणि सुसंस्कृततेचा काहीच संबंध नाही हे पटवून द्यायचा चंग अनेकांनी बांधला असावा का? तसे नसते तर सार्वजनिक संपत्तीची तोडफोड, सार्वजनिक सुविधांचा गैरवापर आणि नियमांची ऐशीतैशी अनेकांनी केली असती का? सामाजिक बांधिलकीचा कपाळमोक्ष झाल्याची भावना निर्माण होईल अशी घटना सोलापुरात नुकतीच घडली.


करमाळा उपजिल्हा रुग्णालयातील अतिगंभीर रुग्णांना प्राणवायूचा पुरवठा केला जात होता. तो अचानक विस्कळीत झाल्याचे लक्षात येताच संबंधितांची धावपळ झाली. असे का घडले याचा शोध घेतला गेला. तेव्हा एका अज्ञात व्यक्तीने रुग्णांना प्राणवायूचा पुरवठा करणारा पाइपच चोरून नेल्याचे उघड झाले. रुग्णालयाच्या सीसीटीव्हीतही ते दिसले. तो पाईप किती महत्वाचा आहे हे चोराच्या खरेच लक्षात आले नसेल का? नागपूरमध्ये काही लोकांनी मेट्रोच्या डब्यांचे विद्रुपीकरण केले. त्यांना रंग फासला. सार्वजनिक स्वच्छतागुहांमध्ये असभ्य भाषेत काहीतरी लिहिले जाते. सार्वजनिक उत्सवाप्रसंगी रस्ते खोदले जातात. मुद्दा कोणताही असूदेत सामाजिक आंदोलनांमध्ये पहिला बळी सार्वजनिक संपत्तीचा जातो. शासकीय कार्यालयातील, रुग्णालयातील साहित्याची मोडतोड करतात. बसेस जाळतात. पथदीप फोडतात.

माणसे अशी का वागत असावीत? सामाजिक घटनांची, सामाजिक वातावरणाची जबाबदारी समाजाची पण असते याचा विसर पडत असावा की तसे मूल्यसंस्कारच होत नसावेत? महाराष्ट्राचा साक्षरता दर समाधानकारक असल्याचे सांगितले जाते. पुढारलेले राज्य म्हणून प्रसंगी पाठही थोपटून घेतली जाते. तथापि तो वारसा हरवत चालला असावा का? सामाजिक वर्तन कसे असावे? विशिष्ट प्रसंगांमध्ये कसे वागावे? बोलावे? काय बोलावे? हे शाळा आणि घरांमध्ये शिकवले जात नसावे का? शालेय अभ्यासक्रमात हा विषय फक्त एका तासापुरता मर्यादीत झाल्याचे आढळते. किती पालकांना या विषयाचे महत्व वाटते? मुले पालकांकडे बघून अनेक गोष्टी शिकतात याची जाणीव किती पालकांना असते? अनेक पालकांचेच सामाजिक वर्तन आक्षेपार्ह आढळते. माणसे नियम मोडतात. कायद्याला बगल देतात. पर्यटनस्थळी बंधनांकडे दुर्लक्ष करतात. उगाचच रस्त्यावरील झाडांच्या फांद्या मोडतात. सार्वजनिक नळांना तोट्या नसतात. जिथे असतात तिथले नळ सुरूच असतात. पाणी वाया जाते. अशी माणसे पालक असतील तर त्यांच्याकडून त्यांची मुले काय शिकू शकतील? स्वयंशिस्तीचा अभाव म्हणूनच आढळत असावा का? चांगल्या वाईटाचे भान मुलांना देणे ही सामूहिक जबाबदारी असली तरी ती प्रामुख्याने पालकांची पण नसते का? सामाजिक भान सुटल्याचे दुष्परिणाम फक्त समाजापुरते मर्यादित नसतात. ते घरापर्यंत देखील पोहोचतात. मुले मोठ्याचा आदर ठेवत नाहीत. आईवडिलांना मान देत नाहीत. त्यांचे ऐकत नाहीत. प्रसंगी मारझोड देखील करतात. त्यांना घराबाहेर काढतात. त्यांच्या वर्तनात आपुलकी आणि जिव्हाळा नसतो. विधिनिषेध सुटल्याचेच हे परिणाम नाहीत का? व्यक्तीच्या वैयक्तिक आणि सामाजिक वर्तनातील दुजाभाव अंतिमतः कोणाच्याच हिताचा नाही याची जाणीव होणे हीच कदाचित बदलाची सुरुवात ठरू शकेल.

## मराठवाड्यात रेल्वेचे जाळे वाढविण्यावर भर

मराठवाडा वार्तापत्र : डॉ. अभयकुमार दांडगे

केंद्र सरकारच्या 'अमृत भारत स्टेशन' योजनेंतर्गत देशातील ५०८ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकास कामाचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रेल्वेमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतेच पार पडले. या अंतर्गत महाराष्ट्रातील ४४ पैकी नांदेड विभागातील १४ रेल्वे स्थानकांचे रूप पालटणार आहे. विशेष म्हणजे मराठवाड्यात रेल्वेचे जाळे वाढविण्यावर यामध्ये भर देण्यात आला आहे. भाजपच्या वतीने मराठवाड्याला दिलेली ही सर्वात मोठी भेट ठरणार आहे.



मनमाड ते छत्रपती संभाजीनगर रेल्वे मार्ग दुहेरी होणार आहे. यासाठी ९६० कोटी रुपयांचा निधी मंजूर झालेला आहे. भविष्यात या मार्गाचे दुहेरीकरण होणार असल्याने याचा फायदा दळणवळणासाठी तसेच प्रवाशांच्या सोयीसाठी होणार आहे. मराठवाड्यातील जालना ते जळगाव तसेच जालना ते खामगाव या दोन्ही मार्गांचे काम लवकरच हाती घेण्यात येणार आहे. अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत जवळपास तब्बल २५ हजार कोटी रुपये रेल्वेच्या प्रवाशांना सर्व सुख-सोयी प्रदान करण्यासाठी खर्च होत आहेत. याचा थेट लाभ रेल्वे प्रवाशांना होणार आहे. अमृत भारत स्टेशन योजनेच्या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील ४४ रेल्वे स्थानकांचा समावेश असून यात छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणीसह दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील १४ रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. यात नांदेड जिल्ह्यातील मुदखेड व किनवटचा समाविष्ट आहे. मराठवाड्यातील जालना, परभणी, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, लातूर, बीड आणि नांदेड जिल्ह्याला मोठा लाभ मिळणार आहे. देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी नांदेड भेटीत विकासाचा अनुशेष आम्ही दूर करू, असा विश्वास दर्शविला होता.

गृहमंत्री शहा यांच्या दौऱ्यानंतर मराठवाड्याला अनेक योजनांद्वारे भरभरून निधी मिळत आहे. नांदेड जिल्ह्यातील मुदखेड रेल्वे स्थानकासाठी २३ कोटी दहा लाख रुपये, तसेच किनवट येथे २३ कोटी रुपये खर्च करून अद्ययावत रेल्वे स्थानक उभारण्यात येणार आहे. या विकास प्रकल्पात रेल्वेची इमारत, पार्किंग व्यवस्था तसेच दर्जेदार प्रतीक्षालय, लिफ्ट, एस्केलेटर, पादचारी पूल, व्हीआयपी कक्ष आदींसह स्थानकाचे पूर्ण रूप बदलण्यात येणार आहे. याबरोबरच रेल्वे विद्युतीकरण प्रगतिपथावर असून नवीन वंदे भारत रेल्वे मराठवाड्यात सुरू होणार आहे. भाजपमुळे मराठवाड्यात ही विकासाची गंगा वाहत असून याचे श्रेय घेण्यासाठी मात्र भाजपेतर पक्षाचे खासदार, आमदार तसेच माजी मंत्र्यांनी पुढाकार घेतल्याचे दिसून येत आहे.

केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे हे मराठवाड्यातील जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतात. त्यांच्या पुढाकाराने मराठवाड्यात रेल्वेविषयक अनेक प्रश्न मार्गी लागत आहेत. लातूर रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासासाठी १९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मागील नऊ वर्षांच्या काळात लातूर रेल्वे स्थानकावरून अनेक नव्या रेल्वे गाड्या सुरू झाल्या आहेत. त्यामुळे शिक्षण, कृषी उद्योगात आघाडीवर असलेल्या लातूर जिल्ह्यातील नागरिकांना प्रवास करणे अत्यंत सुलभ झाले आहे. वंदे भारत या अत्याधुनिक रेल्वेच्या कोचची फॅक्टरी लातूरमध्ये असल्याने स्थानिक लोकांना रोजगारदेखील उपलब्ध होत आहे. अमृत भारत रेल्वे स्टेशन योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यातील चार रेल्वे स्थानकांच्या विकासासाठी पायाभरणीचा कार्यक्रम रेल्वे स्थानक परिसरात पार पडला. परभणी जिल्ह्यातील परभणी, पूर्णा, गंगाखेड आणि सेलू या रेल्वे स्थानकांचा अत्याधुनिक सुविधांनी पुनर्विकास करण्यात येणार आहे.

दरम्यान, धाराशिव येथील रेल्वे स्थानक नूतनीकरण समारंभात राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा. तानाजीराव सावंत यांना डावलल्याने शिवसैनिकांनी संताप व्यक्त केला. रेल्वे स्थानक नूतनीकरणाच्या कोनशिलेवर पालकमंत्र्यांचा नावाचाही उल्लेख न केल्यामुळे राज्यशिष्टाचाराचा भंग करणाऱ्या रेल्वे प्रशासनावर कारवाई करण्याची मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे. महाराष्ट्रात धाराशिव जिल्ह्याचे नेतृत्व करणारे पालकमंत्री असलेल्या नेत्याला डावलून हा कार्यक्रम आयोजित करून रेल्वे प्रशासनाकडून दुजाभावाची वागणूक दिली गेल्याचा आरोप शिवसेनेच्या वतीने करण्यात आला. देशात सध्या २५ वंदे भारत रेल्वे सुरू करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी पाच वंदे भारत महाराष्ट्रासाठीच आहेत. मराठवाड्यातील लातूर येथील कोच फॅक्टरीत १०० वंदे भारत गाड्या तयार होणार असल्याची माहिती केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी दिली. यामुळे मराठवाड्याचे नाव संपूर्ण देशपातळीवर कोरले जाणार आहे.

मराठवाड्यातून विदर्भ तसेच उत्तर महाराष्ट्राला जोडणाऱ्या नवीन रेल्वे मार्गाचे कामही लवकरच सुरू होणार आहे. सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल. मराठवाडा रेल्वे संघर्ष समितीने मराठवाड्यातील विविध रेल्वेविषयक समस्यांची मागणी वारंवार केंद्र सरकारकडे केलेली होती. यवतमाळ, वर्धा रेल्वे मार्गाचे काम सुरू असले तरी नांदेडच्या बाजूने हे काम रखडले आहे. ते काम तत्काळ पूर्ण व्हावे, अशी मागणी मराठवाडा रेल्वे संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे. याबरोबरच मनमाड-परभणी दुहेरीकरणाचे काम सुरू असले तरी ते काम तत्काळ पूर्ण झाल्यास या कामाला गती मिळणार आहे. छत्रपती संभाजीनगर ते अहमदनगर या नवीन रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण झालेले आहे; परंतु हे काम पूर्ण झाल्यास पुण्याला जाण्यासाठी मराठवाड्यातील प्रवाशांना जवळचा मार्ग उपलब्ध होणार आहे. मराठवाड्यातील नांदेड रेल्वे डिव्हिजन अंतर्गत सर्वाधिक उत्पन्न देणाऱ्या स्थानकांवर उन्हाळी व हिवाळी विशेष रेल्वे सुरू करताना अनेकदा दुजाभाव केला जातो. ज्या मार्गावर उन्हाळ्यात जादा रेल्वेची गरज असते, त्या रेल्वे सुरू न करता रेल्वे विभाग स्वतःच्या सोयीच्या गाड्या सुरू करतात, असा येथील प्रवाशांचा अनुभव व आरोप आहे.

प्रत्यक्षात पूर्वी राज्याला रेल्वे संदर्भात अकराशे कोटींचा निधी मिळत होता. आता साडेबारा ते तेरा हजार कोटी रुपये निधी मिळत आहे. त्यामुळे रेल्वे संदर्भातील अनेक कामे हाती घेण्यात आली आहेत. मार्च २०२४ अखेरपर्यंत राज्यातील सर्व रेल्वे मार्गांचे विद्युतीकरण पूर्ण केले जाणार आहे. याशिवाय नवीन रेल्वे मार्गही हाती घेतले आहेत. त्यात सोलापूर-तुळजापूर, वर्धा-यवतमाळ - नांदेड, अहमदनगर ते आष्टी, बीड ते परळी मार्गालाही मंजुरी दिली आहे. याबरोबरच जालना ते जळगाव रेल्वेमार्गाला रेल्वे बोर्डाने मान्यता दिली असून हे प्रकरण वित्त विभागाकडे पाठवण्यात आले आहे. मराठवाड्यात रेल्वे विकास कामाद्वारे प्रगतीच्या नव्या संधीही उपलब्ध झाल्या आहेत. याचे सर्व श्रेय भाजपला जात आहे.

## दिल्ली सरकारचे दात उपटले!

दिल्लीमधील केजरीवाल सरकारचे अधिकार मर्यादित करणारे दिल्ली सेवा विधेयक राज्यसभेने संमत केले. राज्यसभेत सत्ताधारी पक्षापेक्षा विरोधी पक्षाच्या खासदारांची संख्या जास्त आहे. मोदी सरकारने मांडलेले विधेयक मंजूर होऊ नये, यासाठी विरोधी पक्षांनी आपली सर्व ताकद पणाला लावली होती. राज्यसभेत १३१ विरुद्ध १०२ मतांनी दिल्ली सेवा विधेयक संमत झाले. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर त्याचे कायद्यात रूपांतर होईल. केजरीवाल सरकारच्या मनमानी, भ्रष्टाचारी, बेकायदेशीर कारभाराला लगाम घालण्यासाठी विधेयक हे आणावे लागले, अशी भूमिका केंद्र सरकारने मांडली व दुसरीकडे विधेयक मंजूर होऊ नये म्हणून काँग्रेसने आम आदमी पक्षाला साथ दिली.

कोणतेही सरकार घटनेला बांधिल असते. घटनेच्या अधिन राहूनच सरकारला काम करावे लागते. सरकारला निश्चितच अधिकार असतात. पण त्याचबरोबर कर्तव्य भावनेने घटनेच्या चौकटीत नि:पक्षपणे काम करावे, असेही अपेक्षित असते. पण आपणच दिल्लीचे सर्वेसर्वा आहोत, असा अहंकार व हट्टीपणाने केजरीवाल सरकारला ग्रासले आहे. दिल्ली सेवा विधेयक संमत झाल्याने आता केजरीवाल सरकारचे नोकरशहांच्या नेमणुका व बदल्यांचे अधिकार संपुष्टात आले आहेत. ते अधिकार आता केंद्र सरकारकडे वर्ग झाले आहेत. दिल्ली सेवा विधेयक मंजूर झाल्यानंतर खरोखर दिल्ली सरकारचे काही औचित्य राहिले आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. दिल्ली सरकार म्हणजे अरविंद केजरीवाल यांचे सरकार. केजरीवाल हेच आम आदमी पक्षाचा आणि दिल्ली सरकारचा चेहरा आहेत. दिल्लीच्या सातही लोकसभा मतदारसंघात २०१४ आणि २०१९ मध्ये भाजपचे खासदार निवडून आले. पण दिल्ली विधानसभा ताब्यात घेण्यास भाजपला जमलेले नाही. केंद्रात भाजप पण दिल्लीत आम आदमी पक्ष असा मतदारांनी कौल दिला आहे. दिल्लीकरांनी दिल्ली विधानसभा सलग तिसऱ्यांदा केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पक्षाकडे सोपवली आहे. दिल्ली सेवा विधेयकाने दिल्ली सरकारचे महत्त्वाचे अधिकारच केंद्राने काढून घेतले आहेत. म्हणूनच दिल्ली सरकारची अवस्था आता आजारी माणसासारखी झाली आहे. दिल्ली सरकारचे दातच केंद्राने उपटून टाकले आहेत.


दिल्ली सेवा विधेयकाने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे पंख कापले आहेत. केजरीवाल सरकार आणि मोदी सरकार यांच्यात सतत वादावादी चालू असते. जरा संधी मिळाली की, केजरीवाल सरकार केंद्रावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करतात. केंद्र सरकार आणि मोदी सरकार यांचे एकमेकांवर सतत आरोप चालू असतात. केजरीवाल तर दिल्लीच्या नायब राज्यपालांशी सतत भांडण उकरून काढत असतात. दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा नाही, याचे भान केजरीवाल यांनी ठेवले, तर अनेक कटू प्रसंग टळू शकतात. दिल्ली सेवा विधेयकाने केजरीवाल यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे. केजरीवाल हे मुख्यमंत्री असले तरी ते काही पूर्ण राज्याचे मुख्यमंत्री नाहीत. त्यांना नव्या विधेयकाने लक्ष्मणरेषा घालून दिली आहे. नवी दिल्ली ही देशाची राजधानी आहे. जगातील अनेक लहान-मोठ्या देशांचे दूतावास राजधानी दिल्लीत आहेत. संसद भवन, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, एनएमडीसी, दिल्ली विकास प्राधिकरण, विमानतळ विकास प्राधिकरण, दिल्ली मेट्रो, दिल्ली पोलिसांचे मुख्यालय, पासपोर्ट कार्यालय, केंद्र सरकारची विविध मंत्रालयांची मुख्यालये, आकाशवाणी, दूरदर्शन केंद्र, दिल्ली कॅन्टोंमेंट, राष्ट्रपती निवासस्थान, पंतप्रधानांचे निवासस्थान, केंद्रीय मंत्र्यांची निवासस्थाने, आंतरराज्य बस स्थानक, रेल भवन, बहुतेक मोठ्या राजकीय पक्षांची मुख्यालये दिल्लीतच आहेत.

राजधानीत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्था व संघटना आहेत. या सर्वांवर दिल्ली सरकारचा अधिकार चालणार, असे कसे गृहीत धरता येईल? दिल्लीत जगभरातील उच्चपदस्थांची तसेच राष्ट्रप्रमुखांची सतत ये-जा चालू असते. त्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. नवी दिल्लीत पायाभूत सुविधा अत्याधुनिक व अद्ययावत असल्याच पाहिजेत. काळानुसार पायाभूत सुविधांचा विकास होतच असतो. हे सर्व पूर्ण राज्याच्या दर्जा नसलेल्या दिल्ली सरकारचे काम नाही. दिल्ली सरकारमध्ये अनेक विभाग आहेत. जनतेच्या करातून दिल्ली सरकारला अमाप पैसा मिळतो. पण केजरीवाल सरकारच्या जाहिरातींवर तसेच आमदारांच्या वेतन व भत्त्यांवर वारेमाप खर्च होतो. मग हवेच कशाला दिल्ली सरकार, असा एक नवा वाद सुरू झाला आहे.

दिल्लीत महानगर परिषद अगोदरपासून होतीच. बगीचे, मोठे रस्ते, इस्पितळे, नागरी सेवा, वॉटर व सिव्हरेज बोर्ड हे पूर्वी महानगर परिषदेकडेच होते. ट्रान्स यमुना बोर्ड, स्लम बोर्ड, ग्रामीण बोर्ड, डीटीसी, देसू हे सर्व प्रूवी दिल्ली महानगर परिषदेच्या अधिकार कक्षेत होते. दिल्ली ही देशाची राजधानी आहे. गृह व नगर विकास खात्याचे अधिकार सुरुवातीपासून केंद्र सरकारकडे आहेत आणि तसे असणे गरजेचेही आहे. दिल्लीत असलेल्या विधानसभेला इतर राज्यांप्रमाणे दर्जा नाही. दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा देणे शक्य होणार नाही. विरोधी पक्षात असताना सारेच पक्ष दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा द्यावा, अशी मागणी करतात, पण केंद्रात सत्तेत आल्यावर या मागणीवर मूग गिळून बसतात. भाजपच्या निवडणूक जाहीरनाम्यातही दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याचे आश्वासन दिलेले आहे. पण हा पक्ष केंद्रात सत्तेवर आल्यावर दिल्लीला प्रूण राज्याचा दर्जा देणे व्यवहार्य नाही, हे भाजपला कळून चुकले. अरविंद केजरीवाल गेली नऊ वर्षे दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदावर आहेत. त्यांनी दिल्लीसाठी काय मोठे काम केले? हे दाखवता येत नाही. मोहल्ला क्लिनिक किंवा सुंदर चकाचक शाळांच्या इमारती ते दाखवतात. पण सरकार म्हणून हे काम पुरेसे नाही. नऊ वर्षांत मुख्यमंत्री म्हणून केजरीवाल यांची महत्त्वाकांक्षा खूप वाढली आहे. आम आदमी पक्षाची पंजाबमध्ये सत्ता आल्यापासून त्यांना दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा, यासाठी ते अधिक आग्रही झाले आहेत. केजरीवाल गेली नऊ वर्षे दिल्लीच्या जनतेला मूर्ख बनविण्याचे काम करीत आहेत, पण दिल्ली सेवा कायद्यात सुधारणा झाल्याने यापुढे त्यांना मनमानी कारभार करता येणार नाही. मुख्यमंत्री निवासस्थानाची रंगरंगोटी आणि नवीन फर्निचर यावर त्यांनी लाखो रुपये उधळले आहेत.

**- इंडिया कॉलिंगः डॉ. सुकृत खांडेकर**

## शब्दकोडे-१५३



आडवे शब्द - १. सज्जनांच्या नेहमीच विरूद्ध ४. चाणक्यनीती १०. लगत, शेजारी-शेजारी ११. समूह, संच १२. शेतावरील कर १३. इमारतीच्या पायात भरण्याचा राडारोडा १५. चुलता १६. घोड्याला आवर घालणारी वादी १७. उष्ण, कढत १९. नेमाने वारी करणारा २०. धनुष्य, नावाडी २१. साहित्यातील नऊ भावना २४. सरळ लांब वासा २५. यज्ञ २६. फार उष्ण व थंड नसलेले २८. अनाथांना आश्रय देणारी संस्था २९. निरर्थक बडबड ३१. छंद, आवाज ३२. 'अपना हाथ ----!' ३३. सध्याचे युग ३४. मोठी बहीण ३५. वर्ष, सन ३६. उजाड ३८. कान व डोळे यामधील भाग ४०. नुकतेच निधन झालेले प्रसिद्ध नाटककार- --- सरकार ४२. कौसल्यापुत्र ४३. जनावरांचा समूह ४४. हिंमत, धैर्य ४६. एक उबदार व सन्मानाचे वस्त्र ४७. दुप्पट (इंग्रजी) ४९. मध्यस्थ ५१. हिंदीत कीव, करूणा ५३. शर्विलक ५४. नोकर ५६. परग्रहावर जाणारे वाहन ५९. मेहरबानी ६०. बरोबर आलेली मंडळी ६३. जमीनजुमला ६६. श्रीमंत ६७. फोडामधील द्रव ६९. अवाढव्य, प्रचंड ७१. धैर्य ७२. मोठा समुद्र ७३. सूत काढण्याचे साधन ७४. वरपांगी, दिखाऊ

उभे शब्द - १. केशरचनेचा एक प्रकार, दुहेरी विण २. टक, दृष्टी ३. सनसनाटी ४. दुसऱ्याला कर्जबाजारी करणारा धंदा ५. मळलेला ६. टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास ७. अस्थिर, डळमळीत ८. अर्पिलेली वस्तू ९. आळशांनी लक्षात घ्यायचा पंडित नेहरूंचा संदेश १२. क्षुधावर्धक गरम पेय १४. विटीदांडूच्या खेळातील खड्डा २०. हिंदीत सावली २१. रोख २२. नवरदेव २३. पोरका २४. सक्तमजुरीची शिक्षा २७. बंदी २८. उपासमारीची स्थिती ३०. जम ३३. चिवचिवाट ३४. संगीतातील ठेका ३५. वर्षानुवर्षे ३७. सारखा ३८. कपडालत्ता ३९. गार, थंड ४१. संगीतातील एक राग ४४. अगम्य ४५. नूतन ४८. फणसाचा एक प्रकार ५०. कीव, करूणा ५२. रत्न ५५. गव्हाचे जाडसर पीठ ५७. लग्नातील नवरा मुलगा ५८. देशी दारू ६१. सैन्यातील एक हुद्दा ६२. सामान ६४. बातमीदार ६५. मुलायम ६८. षट, पाचनंतरचा आकडा ६९. नंतर ७०. पराभव, माळ ७१. प्रामाणिक

### शब्दकोडे १५२ चे उत्तर

आडवे उत्तर

१.नवराबायको ५.साधासामग्री ९.पोत ११.कार १२.यजमान १३.याग १५.रणगाडा १८.वजाबाकी २१.वसुदेव देवकी २३.जर २४.जनक २६.लव २८.सालस ३०.डर ३२.नमस्कार ३५.गराडा ३७.कसाई ३८.पाला ४०.डळमळीत ४२.माया ४३.ललना ४४.पात ४५.नाक ४६.भू ४७.बाग ४९.नवरात्र ५०.डेरा ५२.अनाथ ५४.जलपान ५६.सर ५८.कचरा ५९.करतल ६३.लपणे ६५.जननमरण ६६अ.ददात ६८.करवत ७०.सवालजबाब ७२.सरबत ७४.चिड ७५.वरळी ७६.कर ७७.पत ७८.रोगी ७९.रव ८०.पाडाव ८१.टकळी

उभे उत्तर

१.नकार २.वरण ३.बाकडा ४.कोयता ५.सामनसुमान ६.धन ७.साया ८.मग १०.तपकीर १४.राजा १६.गायक १७.पावमस्का १८.वकील १९.बाज २०.सल २२.वसा २४.जड २५.नरकयातना २७.वनपाल २९.सगळीकडे ३१.साईबाबा ३३.रस्सा ३४.रडतराऊत ३६.रात ३९.लालनपालन ४१.मना ४४.पाव ४८.गजराज ५१.रास ५२.अबोल ५३.थकवा ५५.ठो ५७.रडतखडत ५९.करभार ६०.रण ६१.लकेर ६२.मदत ६४.परवानगी ६६.नरबळी ६७.आजवर ६८.कतरण ६९.वहिवाट ७१.बारव ७२.सरडा ७३.बक ७४.चिपळी

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# महाज्योतीच्या एमएच सेट परीक्षा प्रशिक्षण योजनेमुळे ९२ विद्यार्थी यशाचे मानकरी

**नाशिक । प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था महाज्योती, नागपूर व सीआरजी अकादमी फॉर सक्सेस, पुणे या संस्थेमार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यासाठी युजीसी नेट, सीएसआयआर नेट, एमएच सेट परीक्षापूर्व प्रशिक्षण योजना राबविण्यात येते. या प्रशिक्षण योजनेचा लाभ घेतलेल्या १ हजार २०७ विद्यार्थ्यांपैकी ९२ विद्यार्थी यशाचे मानकरी ठरले आहेत. अशी माहिती महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे.

लक्षीत प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्राध्यापक, सहायक प्राध्यापक पदाची संधी मिळावी या उद्देशाने युजीसी नेट, सीएसआयआर नेट, एमएच सेट परीक्षापूर्व प्रशिक्षण योजना सुरु करण्यात आली आहे. याकरीता दि. १५ सप्टेबर २०२२ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. प्रशिक्षणास इच्छुक नॉनक्रेमीलेअर उत्पन्न गटातील उमेदवारांकडून महाज्योतीच्या संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी एकूण १ हजार ५५६ विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केले. निवड प्रक्रियेत पात्र ठरलेल्या १ हजार २०७ विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचा लाभ घेता आला. यापैकी १ हजार १२७ विद्यार्थ्यांना ऑफलाईन तर ८० विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले. यातील ९२ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

प्रशिक्षण कालावधीत एमएच सेट परीक्षा प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, आवश्यक व आकस्मिक गरजेकरीता सहा महिने विद्यावेतन देण्यात आले. मोफत प्रशिक्षणात निवडण्यात आलेल्या विषयाचे वर्ग, विषयवार चर्चा, प्रश्नपत्रिका सोडवून घेण्यात आल्या. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये प्रियंका ठाकरे, परमेश्वर दास, वैभव कापसे, भुपेंद्र ढाले, महेश भांडे, भावीका शिंदे, अश्विनी वडे, उमेश पालवे, रिना चव्हाण, खुशवंत नांथे, विशाल आदमने, अपेक्षा गावंडे, विष्णू गोरे, मनिषा तोरकडे, विकास पिसे या व इतर विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

सहकार व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे तथा अध्यक्ष महाज्योती, नागपूर यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच महाज्योतीतर्फे राबविण्यात येणाऱ्या युजीसी नेट, सीएसआयआर नेट, एमएच सेट परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेचा अधिकाधिक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे. व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### एमएच सेट उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे मनोगत

**महाज्योतीमुळे आई-वडीलांचे शिकून मोठा होण्याचे स्वप्न साकार झाले. वृत्तपत्राच्या माध्यमातून**



**महाज्योतीच्या युजीसी नेट/ सीएसआयआर नेट/ एमएच सेट परीक्षापूर्व प्रशिक्षण योजनेची माहिती मिळाली. सुचनेनुसार अर्ज करुन प्रशिक्षणास पुणे येथे पाठवण्यात आले. सहा महिन्याच्या प्रशिक्षण कालावधीत महाज्योतीकडून विद्यावेतन देण्यात आले. विद्यावेतनाने पुण्यात राहण्या, खाण्याची, शिक्षणाची, शैक्षणिक साहित्याची सोय करता आली. याआधारे सेट परीक्षा पास करता आली. आज मी कॉमर्स कॉलेजला सहाय्यक प्राध्यापक म्हणून कामाला लागलो. आई-वडीलांचे शिकून मोठा होण्याचे स्वप्न महाज्योतीमुळे पुर्ण झाले आहे.**

**-वैजनाथ भारत इडोळे, आडोळी, वाशीम**

**महाज्योती गरीबातल्या गरीब विद्यार्थ्यांपर्यंत पोहचून शैक्षणीक, आर्थिक मदत करत आहे. मी रसायनशास्त्र**



**हा विषय घेऊन सेट पास झालेले आहे. सेट मधे दोन विषय असतात एक कॉमन असतो आणि दुसरा निवडायचा असतो. कॉलेजमधील शिक्षकांकडून महाज्योतीच्या युजीसी नेट/सीएसआयआर नेट/ एमएच सेट परीक्षापूर्व प्रशिक्षण योजनेची माहिती मिळाली. मार्गदर्शन मिळाले. पुण्यातील प्रशिक्षणाच्या कालावधीत विद्यावेतन मिळाले. त्याने पुण्यात राहण्या, खाण्याची, अभ्यासाची सोय झाली. माझ्यासह माझ्यासारखे बरेच विद्यार्थी होते जे महाज्योतीच्या या योजनेचा लाभ घेत होते. आणि ते सारेच खुप सामान्य घरातून आलेले होते. महाज्योती गरीबातल्या गरीब विद्यार्थ्यांपर्यंत पोहचून त्याला शैक्षणिक, आर्थिक मदत करत आहे. घडवित आहे.**

**- प्रणीता जावळे, जळगाव**



# विद्युत भवनात सद्भावना दिनी सामूहिक प्रतिज्ञा

**नाशिक । प्रतिनिधी**

भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती दरवर्षी 'सद्भावना दिवस' म्हणून साजरी केली जाते. महावितरणच्या नाशिक परिमंडल कार्यालयात विद्युत भवन येथे आज शुक्रवारी(१८ ऑगस्ट) रोजी मुख्य अभियंता दिपक कुमठेकर यांच्या हस्ते राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्य अभियंता दिपक कुमठेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सद्भावना दिनानिमित्त सामुहिक प्रतिज्ञा घेतली.

याप्रसंगी अहमदनगर मंडळाचे अधिक्षक अभियंता प्रकाश खांडेकर, सहाय्यक महाव्यवस्थापक महेश बुरंगे व लक्ष्मण वसावे, कार्यकारी अभियंता योगेश निकम व निलेश चालीकवार, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी प्रमोद राजेभोसले, व्यवस्थापक राजा बोढारे, सहाय्यक विधी अधिकारी रणजीत बोम्मी, जनसंपर्क अधिकारी विकास आढे, उपकार्यकारी अभियंता सुरेंद्र उन्हाळे, सहाय्यक अभियंता सागर खंबाईत, उपव्यवस्थापक सदू जाधव व प्रवीण गटकळ आणि अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# नाशिक तहसिल कार्यालात ५ सप्टेंबर रोजी होणार जप्त वाहनांचा लिलाव : तहसीलदार पवार

**नाशिक ।** नाशिक तालुक्यातील अवैधरित्या गौणखनिजाची वाहतूक करीत असतांनाजप्त करण्यात आलेल्या वाहनांची मंगळवार ५ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता जाहीर लिलावाने विक्री करण्यात येणार आहे. याकरीता इच्छुकांनी नाशिक तहसील कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे नाशिकच्या तहसीलदार रचना पवार यांनी शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

नाशिक तालुक्यातील वाळु चोरी विरोधी पथकांनी अवैधरीत्या गौण खनिजांची वाहतुक करीत असतांना नितीन इश्वर गुंजाळ, रा. गंगापुर, तालुका नाशिक यांचे चक्र-१८/छ-३४३२ क्रमांकाचे जे.सी.बी.व खलिल शेख, रा. मोरवाडी, अंबड पोलीस चौकीजवळ, नाशिक यांचे चक्र-०४/ड-८०५३ क्रमांकाचा टेम्पो जप्त केल्या आहेत. या वाहन मालकां विरूद्ध दंडात्मक कार्यवाही करण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत. परंतू या वाहनांच्या मालकांनी दंडात्मक कार्यवाहीच्या आदेशातील रक्कम शासनास जमा केली नसल्याने या वाहनांची जाहीर लिलावाद्वारे विक्री करून दंडात्मक कार्यवाहीतील रक्कम वसुल करण्यात येणार असल्याचे ही तहसीलदार रचना पवार यांनी सांगितले आहे.

या लिलावाबाबतचा अर्ज, लिलाव होणाऱ्या जंगम मालमत्तेची हातची किंमत, अनामत रक्कम तसेच लिलावाच्या अटी व शर्ती याचा सविस्तर तपशीलासाठी तहसीलदार, नाशिक यांच्या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

# गर्भलिंग निदानास पायबंद घालण्यासाठी सोनोग्राफी सेंटर्सची नियमित तपासणी करावी

**जिल्हाधिकारी जलज शर्मा**

**नाशिक । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सद्यस्थितीतील लिंग गुणोत्तर प्रमाण लक्षात घेता गर्भलिंग निदानास पायबंद घालण्याच्या दृष्टीने सोनोग्राफी सेंटर्सची नियमित तपासणी करण्यात यावी. त्याचप्रमाणे लिंग गुणोत्तर वाढीच्या दृष्टीने आरोग्य यंत्रणेने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना आज जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी आरोग्य यंत्रणांना दिल्या आहेत.

आज जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आरोग्य विभागाच्या पीसीपीएनडीटी व राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम व तंबाखु नियंत्रण कायदा २००३ अंतर्गत जिल्हास्तरीय समितींच्या आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी जलज शर्मा बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात,जिल्हा



आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निलेश पाटील, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. संदिप सुर्यवंशी, वैद्यकीय अधिकारी बाह्यरूग्ण कक्ष डॉ. अनंत पवार, महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. नितिन रावते, सहाय्यक वैद्यकीय अधिकारी तथा क्षयरोग अधिकारी डॉ. आवेश पलोड, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र बागुल, राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम विभागाच्या उज्वला पाटील यांच्यासह ग्रामीण, उपजिल्हा व महिला रुग्णालयाचे वैद्यकिय अधिकारी उपस्थित होते.

पीसीपीएनडीटी समितीच्या कामाचा आढावा घेतांना जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, या समितीच्या अंतर्गत मुलींचा जन्मदर वाढविण्याच्या दृष्टिने आरोग्य यंत्रणेने आवश्यक उपाययोजना कराव्यात. यात आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका यांच्या माध्यमातून गावपातळीवर पहिले अपत्य मुलगी असेल अशा गर्भवती महिलांचे समुपदेशन करण्यात यावे. या बैठकीनंतर राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम व तंबाखु नियंत्रण कायदा २००३ अंतर्गत जिल्हास्तरीय समितीने वर्षभरात राबविलेल्या उपाययोजनांची माहिती उज्वला पाटील यांनी दिली. जिल्ह्यातील दिंडोरी, निफाड, चांदवड, पेठ, कळवण व सुरगाणा हे सहा तालुके तंबाखुमुक्त झाले आहेत. तसेच एप्रिल, २०२३ ते जुलै २०२३ या कालावधीत जिल्ह्यातील साधारण ३८०० शाळांमध्ये तंबाखुमुक्त शालेय अभियान राबविण्यात आले असल्याची माहिती श्रीमती पाटील यांनी दिली. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शाळा तंबाखुमुक्त करण्याच्या दृष्टीने चर्चा करून प्रभावी अभियानाची आखणी करण्यात यावी, अशा सूचनाही जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी दिल्या.

## मुकेश आर. पटेल स्कूल मध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**शिरपूर।** श्री विलेपार्ले केळवणी मंडळ मुंबई, संचलित तांडे ता. शिरपूर येथील मुकेश आर. पटेल निवासी सीबीएसई शाळेत स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विजय अग्रवाल (एलपीसी सदस्य) यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. जॉन लॉरेन्स यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची ज्योत जागृत ठेवण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम शाळेत घेण्यात आले. भारताच्या स्वातंत्र्यासाठी त्याग व बलिदान करणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांचे स्मरण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांचे गायन केले. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात शौर्य गाजवणारे स्वातंत्र्य सैनिक व जनतेच्या मनात देशभक्ती जागृत करणाऱ्या क्रांतिकारकांची वेशभूषा इयत्ता पहिली, दुसरी व तिसरीच्या विद्यार्थ्यांनी साकारून उपस्थितांची मने जिंकून घेतली. देशप्रेम, स्फूर्ती व जोषासह देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर केले.

# डॉ.गंगुबाई हनगल यांचे शिष्य अशोक नाडगीर यांचे सूर विश्वासमध्ये रविवारी गायन

**नाशिक । प्रतिनिधी**

नव्या पिढीतील कलाकारांच्या अविष्काराला हक्काचे व्यासपीठ देण्यासाठी 'सूर विश्वास' या अनोख्या मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. २० ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ७:०० वाजता डॉ. गंगुबाई हनगल यांचे शिष्य अशोक नाडगीर (कुंद गोळ)यांचे गायन होणार आहे. नितीन पवार(तबला), (संवादिनी) यांची त्यांना साथसंगत लाभणार आहे. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. स्मिता मालपुरे या करणार आहेत.



मैफिलीचे हे एकोणतीसवे पुष्प असून विश्वास ग्रुपचे कुटुंबप्रमुख विश्वास ठाकूर व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओच्या समन्वयक ऋचिता ठाकूर हे या उपक्रमाचे आयोजक असून संकल्पना विनायक रानडे यांची आहे. विश्वास गार्डन, ठाकूर रेसिडेन्सी, विश्वास को-ऑप. बँकेसमोर, सावरकरनगर, गंगापूर रोड, नाशिक येथे हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

अशोक नाडगीर यांचा जन्म कर्नाटकातील कुंदगोळ येथे झाला. किराणा घराण्याचे महान गायक उस्ताद पं. सवाई गंधर्व सुद्धा कुंदगोळचेच. नाडगीर यांनी लहानपणी संगीताचे शिक्षण आई पद्मावती नाडगीर यांच्याकडून घेतले. त्यानंतर पं. नागनाथ वोडेयार यांच्याकडे ८ वर्ष संगीताचे शिक्षण घेतले आहे. त्यानंतर श्रीमती कृष्णा हनगल यांच्याकडे व शेवटी त्यांच्या गुरू डॉ. गंगूबाई हनगल यांच्याकडून २५ वर्ष शिक्षण घेतल्यानंतर 'गंडा बंधन' मिळाले. खऱ्या अर्थाने किराणा परंपरेमध्ये त्यांनी संगीताची साधना केली आहे.

पारंपारिक आणि निव्वळ किराणा घराण्याची शैली त्यांनी आत्मसात केली आहे. बंगळुरू, हैद्राबाद, बनारस, इंदूर, मुंबई अशा अनेक प्रतिष्ठेच्या संगीत मैफीलीत यांनी सहभाग घेतला आहे. ते नामवंत रेडिओ कलाकार आहेत. सध्या 'सवाई गंधर्व' संस्थेचे विश्वस्त व सचिव आहेत.

अनेक महत्वाच्या मैफिलीत त्यांचे गायन झालेले असून शास्त्रीय संगीतातील मान्यवर व रसिक कलावंतानी त्यांचे कौतुक केले आहे. तरी या कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विश्वास ठाकूर, ऋचिता ठाकूर व विनायक रानडे यांनी केले आहे.

# एंजल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा



**नंदुरबार । प्रतिनिधी**

नंदुरबार शहरातील गुरुकुल नगरमधील एंजल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी वेगवेगळी वेशभूषा करीत देशभक्तीचा जागर केला व विद्यार्थ्यांनी सैनिकांसह महापुरुषांची पारंपरिक वेशभूषा साकारून देशभक्तीपर कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी देशभक्तीचा जागर करीत दर्शन घडविले. कार्यक्रमास युवा उद्योगपती नितेश अग्रवाल यांना कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आमंत्रित केले होते , शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य जयेश, श्याम बांगड, गिरीश बडगुजर, प्राचार्य प्रीती बडगुजर आदी उपस्थित होते. यावेळी गिरीश बडगुजर यांनी भारतीय स्वातंत्र्य दिनाची माहिती देऊन प्राणाची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांच्या कार्याबाबत सांगितले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी हर्षदा शुक्ला, राधिका गोसावी, भूमिका पेंढारकर, लावण्या पाटिल, गायत्री वाकडे, रितिका, दीपाली सरोज ,भाग्यश्री जगताप, हर्षाली दराडे , भावना मैडम, शुभांगी वैष्णव, सारिका पाटील, पूजा होलकर, प्रतिभा जगताप, शालू सोनवने, यांचे सहकार्य लाभले.

**IN THE COURT OF HON'BLE ADHOC DISTRICT JUDGE-1 & MOTOR ACCIDENT CLAIMS TRIBUNAL AT OSMANABAD.**

Notice to show cause (General Form) (Sch. I.A.H. Form 4) — **Exh. 16** — **M.A.C.P.No. 279/2022**

Claim Rs. 15,00,000/- but restricted upto Rs. 10,00,000/-

**Ashwini w/o Vinod Kale & Others ... Claimants**
**Versus.**
**Mazid s/o Hussain Mansuri & Others. ...Respondents**

To,
1-
Mazid s/o Hussain Mansuri, Age-Major, Occup. Business,
R/o 44, Ganesh Colony, Shirpur, Tal. Shirpur, Dist. Dhule.
Mobile No. 7694072765
[Owner of Truck No. MH-18/BA-0136]**.......Respondent No.1.**

WHEREAS the above named claimant:- Ashwini w/o Vinod Kale & Others, has made an application to this court U/sec. 166 of M.V.Act regarding the compensation of motor accident that, copy of application sent herewith.

You are hereby summons to appear in this court in person or by a pleader duly instructed on the 26/09/2023 at 10.30 a.m. in the forenoon, to show cause against the application failing wherein the said application will be heard and determined Ex parte.

Also take notice that in default to your failing to show cause on or before the date mentioned you are liable to have your defense struck out.

Given under my hand and the seal of the court.
Date :- 18/08/2023

seal

**Signed/-**
**Superintendent**
Adhoc District Court-1,
Osmanabad (By Order)

**ॲड.डी. आर. पाटील, शिरपूर**
**निशाणी नं.- १९**

**जाहिर नोटीस**
**धुळे येथील मे. सिव्हील जज्ज सो. (सि.नि. डिव्ही.) यांचे कोर्टात**
**दि. कि. अर्ज नं. ०१/२०२३**

१) तेजश्री हर्षल विसपुते उ.व.-२७ धंदा-घरकाम
२) शिवांश हर्षल विसपुते उ.व.-०२ धंदा-अज्ञान
दोन्ही रा. प्लॉट नं.९९ गोंदुर रोड देवपुर ता.जि.धुळे (अर्जदार नं. १ स्वतः व अर्जदार नं.२ ची अ.पा.क. आई म्हणुन )
**....अर्जदार**

**विरुध्द**
रेखा सदानंद सोनार (विसपुते) उ.व.-५०, धंदा-घरकाम
रा.प्लॉट नंबर ९९,वृंदावन कॉलनी, गोंदुर रोड, देवपुर धुळे जि. धुळे **....जाबदेणार**

कै. हर्षल सदानंद विसपुते (मृत्यू ता.११/९/२०२२)
रा.गोंदुर रोड, धुळे ता.जि. धुळे **....मयत**

ज्या अर्थी अर्जदार नं. १,२ व जाबदेणार हे मयत कै. हर्षल सदानंद विसपुते यांचे अनुक्रमे पत्नी, मुलगा व आई असे कायदेशिर वारस आहेत. अर्जदार नं. १,२ व जाबदेणार यांना शासकीय व निमशासकीय कामासा वारस दाखला आवश्यक असल्याने, अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन १८२७ सेक्शन २ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी वारसांचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज या मे. कोर्टात त्यांनी दाखल केला आहे.

त्याअर्थी या नोटीसीने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदार नं.१,२ व जाबदेणार यांचे व्यतिरिक्त जे कोणी वारस असतील त्यांनी या मे न्यायालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाचें आंत अगर दिनांक २१/०९/२०२३ रोजी ठिक सकाळी १०.३० वा. स्वतः अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहुन लेखी हरकती सादर कराव्यात अन्यथा सदरील अर्जदार नं. १, २ व जाबदेणार यांचा तोंडी पुरावा घेवुन त्या आधारे अर्जदार नं.१,२ व जाबदेणार यांचे व्यतिरिक्त दुसरे कोणीच मयताचे वारस नाहीत असे गृहीत धरण्यात येवुन मयताचे वारस म्हणून वारसाचे प्रमाणपत्र अर्जदार नं. १,२ व जाबदेणार यांनी केलेल्या मागणी प्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर धुळे यांचे आदेशावरुन सदरची नोटीस प्रसिध्दीस दिली असे. आज रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.
आदेशावरुन

**कनिष्ठ लिपीक दिवाणी न्यायालय,धुळे** (शिक्का) **अधीक्षक दिवाणी न्यायालय,धुळे**

**निशाणी नं.- ६**

**जाहिर नोटीस**
**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे कोर्टात**
**दि. कि. अर्ज नं. १००९/२०२३**

१. मंगलबाई नारायण पाटील वय-५४ वर्ष, कांमधदा-घरकाम
रा.आकार पार्क सेंसायटी रामजी पार्क विजलपुर
ता नवसारी जि नवसारी गुजरात राज्य
२. सुरेखाबाई अशोक पाटील वय-५७ वर्ष, कांमधदा-घरकाम
रा. मालखेडा ता.चोपडा जि.जळगाव
३. चद्रकांत सतोष पाटील वय-५५ वर्ष, कामधंदा-मजुरी
रा. बाम्हणे ता.शिदखेडा जि.धुळे **....अर्जदार**

**विरुध्द**
कै. विमलबाई सतोष पाटील (मयत) मृत्यु दिनांक २५/९/२०२२
मुत्यु ठिकाण-विजलपुर नवसारी ता.जि. नवसारी गुजरात राज्य
**....सामनेवाला**

ज्याआर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात दि. १४/०८/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं. १००९/२०२३चा अर्ज दाखल केलेला आहे ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. विमलबाई सतोष पाटील (मयत)याचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत असे घोषित होवुन मिळण्यासाठी व अर्जदार याना सदर वारस दाखला हा मयताच्या सामाईक नावावर असलेल्या मौजे अकलाड ता जि धुळे येथिल गट क्र ४४४ त्यास क्षेत्र ० हे.५० आर त्यास आकारणी १ रू ५५ पैसे आहे या शेत मिळकतीवर मयताचे वारस म्हणुन नाव लावण्यासाठी अर्जदार वारस दाखला लागणार आहे व इतर शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणर आहे. म्हणुन अर्जदार यानी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क. स्तर यांच्या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ३ याच्या नावाने वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. १५/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. व.स्तर कोर्ट नं.३, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- १७/०८/२०२३ आदेशावरुन

**व.लि. मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.** (शिक्का) **अधीक्षक मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

# लक्ष महाराष्ट्र

शनिवार, दि. १९ ऑगस्ट २०२३




## न्यूज कॉलम

### पत्रकार दीपक शिंदेंना पितृशोक



**धुळे ।** येथील दैनिक ए वन न्यूजचे उपसंपादक, पत्रकार दीपक शिंदे यांचे वडील अरुण मंगा शिंदे यांचे गुरुवारी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर शुक्रवारी कुमारनगर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सूना, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बौध्दवासी अरुण शिंदे यांच्या परिवाराच्या दु:खात धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ व दैनिक लक्ष महाराष्ट्रच्या सहवेदना!

### जागतिक फोटोग्राफर दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**धुळे ।** धुळे जिल्हा फोटोग्राफर असोसिएशनतर्फे आज जागतिक फोटोग्राफर दिनानिमित्त नकाणे गावातील दुलारी गार्डन येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याचे जिल्हाध्यक्ष गणेश पाटील यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. 'एक वृक्ष आपल्या दारी' या संकल्पनेतून रोपांची लागवड, रक्तदान शिबीर, ज्येष्ठ फोटोग्राफर, पत्रकार बांधवांसह गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला आहे.

# तरवाडे येथे २४६ लक्ष रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन

## बाळासाहेब भदाणे यांच्या प्रयत्नाने बोरकुंड- रतनपुरा गटात विकासकामांचा धडाका

**धुळे । प्रतिनिधी**

बोरकुंड- रतनपुरा जिल्हा परिषद गटात विकास कामांचा धडाका सुरुच असुन, दोन्ही गटात लाखोंची कामे सुरु आहेत. यात तरवाडे गावात तब्बल २४६ रुपयांच्या कामांचे लोकार्पण व भूमिपुजन संपन्न झाले. तरवाडे येथे ७४ लक्ष रुपयांची कामे पूर्ण झाली असून या कामांचा लोकार्पण करण्यात आले तर १७२ लक्ष रुपये निधितून, विविध नविन विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला. तब्बल २४६ लक्ष रुपयाची विकासकामे गावात होणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या या कामांच्या लोकार्पण व भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी विविध मान्यवर उपस्थित होते.



तरवाडे येथे झालेल्या या भूमिपूजन व लोकार्पण समारंभाच्या प्रसंगी इंदुबाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे, माजी जि.प.सदस्य प्रभाकर पाटील, धुळे पं.स. उपसभापती देवेंद्र माळी, डॉ. राजेंद्र भदाणे, पं.स.सदस्य बाबाजी देसले तरवाडे सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, विकासोचे सदस्य तसेच बोरकुंड सरपंच हेमंत भदाणे, राजेंद्र मराठे, नाणे, सिताने, नंदाळे, मोरदड, मोरदड तांडा, खोरदड या सर्व गावातील सरपंच उपसरपंच व सहकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सदर भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी गावातील सर्व ज्येष्ठ मार्गदर्शक, तरुण मंडळी, तसेच गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी विविध विकासकामांचे लोकार्पण करण्यात आले. यात तरवाडे ते लोंढरे रस्त्यावर १५ लक्ष रुपये निधितून पाईप मोरी बांधणे, तरवाडे येथे जन सुविधा योजनेतून स्मशानभूमीस १० लक्ष रुपयाची संरक्षण भिंत बांधणे, तरवाडे ते मोरदड ०/०० ते १/०० रस्ता २५ लक्ष रुपये निधितून सुधारणा करणे, तरवाडे येथे मग्रारोहयो योजनेतून २० लक्ष रुपयांचे गावअंतर्गत कॉंक्रिटीकरण करणे, तरवाडे येथे १५ व्या वित्त आयोगातून ४ लक्ष रुपायंची पीव्हीसी गटार बांधणे या कामांचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला.

तसेच पुढील विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. यात तरवाडे येथे १५ व्या वित्त आयोगातून १० लक्ष रुपये निधितून पीव्हीसी गटार बांधणे, तरवाडे ते मोरदड १/०० ते ३/०० रस्ता ४६ लक्ष रुपये निधितून सुधारणा करणे, तरवाडे ते लोंढरे रस्त्यावर ३० लक्ष रुपये निधितून तळफरशी बांधणे, तरवाडे येथे मग्रारोहयो योजनेतून ३० लक्ष रुपये निधितून गावअंतर्गत कॉंक्रिटीकरण करणे, तरवाडे येथे मग्रारोहयो योजनेतून ३० लक्ष रुपयांचे गावअंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे, तरवाडे येथे गौण खनिज निधी अंतर्गत जि. प. मराठी शाळेकडे जाणारा रस्ता १५ लक्ष रुपये निधितून तयार करणे, तरवाडे येथे ११ लक्ष रुपये निधितून व्यायाम शाळा बांधणे, आदी कामांचा यावेळी शुभारंभ करण्यात आला. इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे, सचिव तथा जि.प.सदस्या शालिनी भदाणे यांच्या प्रयत्नाने तरवाडे गावाचा विकासाचा अनुशेष भरुन निघण्यास मदत होणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.



# आयमातर्फे शहीद जवानांच्या विधवांचा सत्कार

### विद्यार्थ्यांच्या संचलनानेही वेधले सर्वांचे लक्ष

**नाशिक । प्रतिनिधी**

अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयमा) चे ध्वजारोहण अध्यक्ष निखिल पांचाल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रथमच भोसला स्कूल तसेच ग्लोबल व्हीजनच्या विद्यार्थ्यांचे ढोल पथकासह संचलन तसेच शहीद जवानांच्या विधवांचा सत्कार आदी कार्यक्रम पार पडले.

देशाचा झपाट्याने विकास होत असून विकास दर सतत असाच वाढता राहिल्यास भारतचा जगात क्रमांक एक होईल असा विश्वास आयमा अध्यक्ष निखिल पांचाळ यांनी यावेळी व्यक्त केला. निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे यांनी नाशिकच्या औद्योगिकसह विविध क्षेत्रात झालेल्या विकासाची माहिती दिली. आयमाचे सरचिटणीस ललित बूब यांनी आभार मानले. शहीद जवानांच्या विधवांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विवेक कुलकर्णी, आयमाचे माजी अध्यक्ष जे.आर. वाघ, एस.एस.आनंद, विवेक पाटील, एस.एस.बिरदी, राजेंद्र अहिरे, आयमाचे उपाध्यक्ष राजेद पानसरे, सुदर्शन डोंगरे, सचिव योगिता आहेर, गोविद झा, खजिनदार राजेंद्र कोठावदे, दिलीप वाघ, अजय यादव, प्रमोद वाघ, हर्षद बेळे, राधाकृष्ण नाइकवाडे, मनोज मुळे, संजय महाजन, विराज गडकरी, हेमत खोंड, भरत येवला, राहुल गांगुर्डे, जयंत पगार, ज्येष्ठ उद्योजक बुधाजी पानसरे, विरल ठक्कर, करणसिंग पाटील, सुनील जाधव, धीरज वडनेरे, राजेंद्र वडनेरे, हेमंत राख, एन. टी. गाजरे, दिलीप पिंगळे आदींसह उद्योजक व विविध औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उद्योगनितीच्या मुखपृष्ठाचे पकाशन पांचाळ आणि बेळे यांच्या हस्ते झाले.

# अजंग विद्यालयात रुख्मिणीताई पाटील व्यासपीठाचे उद्घाटन व नामकरण सोहळा

**धुळे । प्रतिनिधी**

अजंग ता.धुळे येथील जवाहर शिक्षण प्रसारक संस्थेचे अण्णासाहेब रघुनाथ सिताराम पाटील माध्य. विद्यालयातील प्रांगणात उभारलेल्या व्यासपीठाचे ह.भ.प.रुख्मिणीताई रघुनाथ पाटील व्यासपीठ असे नामकरण करण्यात आले.व्यासपीठ नामकरण व उद्घाटन सोहळा माजी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील आणि सौ.लताताई रोहिदास पाटील यांच्या शुभहस्ते नुकताच पार पडला.

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधुन धुळे तालुक्यातील अजंग येथे व्यासपीठ व नामकरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. जवाहर शिक्षण प्रसारक संस्थेचे अण्णासाहेब रघुनाथ सिताराम पाटील माध्य.विद्यालयात विविध शालेय कार्यक्रमांसाठी भव्य व्यासपीठ उभारण्यात आले आहे.



बाजार समितीचे माजी सभापती व विद्यालयाचे स्थानिक चेअरमन गुलाबराव पाटील यांनी आपल्या मातेश्रींच्या स्मृतीप्रित्यर्थ हे व्यासपीठ उभारुन दिले आहे. व्यासपीठाचे माजी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील आणि सौ.लताताई रोहिदास पाटील यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील, खरेदी विक्रीचे चेअरमन लहू पाटील, बाजार समितीचे माजी सभापती गुलाबराव कोतेकर, माजी सभापती गुलाबराव पाटील, उपसभापती योगेश पाटील,संचालक साहेबराव खैरनार,विशेष कार्य अधिकारी प्रकाश पाटील, संचालक एन.डी. पाटील,रावसाहेब पाटील,कुणाल पाटील, नानाभाऊ शिंदे, डॉ.संदिप पाटील,ऋषीकेश ठाकरे, माजी संचालक राजेंद्र भदाणे, माजी सरपंच सोमनाथ पाटील, युवा नेते सागर पाटील, संतोष राजपूत, आदी उपस्थित होते.

# स्व. तपनभाई पटेल यांच्या जन्मदिनी ७२१ रक्तदात्यांनी रक्तदान करुन वाहिली श्रद्धांजली

**शिरपूर । प्रतिनिधी**

मुंबई येथील श्री विलेपार्ले केलवणी मंडळ ट्रस्टी, शिरपूर वरवाडे नगरपरिषदेचे नगरसेवक, शिरपूर टेक्स्टाईल पार्क चेअरमन, आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट उपाध्यक्ष स्व. तपनभाई मुकेशभाई पटेल यांच्या जन्मदिनी गुरुवारी दि. १७ ऑगस्ट २०२३ रोजी शिरपूर टेक्सटाईल पार्क येथे दिवसभरात ७२१ दात्यांनी रक्तदान करुन भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

शिरपूर वरवाडे नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, शिरपूर टेक्स्टाईल पार्क चेअरमन तथा उद्योगपती चिंतनभाई पटेल यांच्या हस्ते स्व. तपनभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून रक्तदान शिबिराचा शुभारंभ करण्यात आला.



यावेळी शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव प्रभाकरराव चव्हाण, श्री बालाजी संस्थान उपाध्यक्ष गोपाल भंडारी, शिरपूर पीपल्स बँकेचे चेअरमन योगेश भंडारी, कैलासचंद्र अग्रवाल, जनकभाई पटेल, पंकीलभाई पटेल, नितीन अग्रवाल, अतुल भंडारी, प्रशांत अग्रवाल, विनय भंडारी, विजय भंडारी, अनुज दायमा, कमलेश अग्रवाल, राजेंद्र देसले, नीरज अग्रवाल, नीरज भंडारी, राजू सोनवणे (सामाजिक कार्यकर्ता), सहाय्यक सरव्यवस्थापक शरद पगारे, शिरपूर टेक्सटाईल पार्क मधील विविध कंपन्यांचे संचालक, अधिकारी व कर्मचारी तसेच शिरपूर शहर व तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी, नागरिक, एच. आर. टीमचे सर्व कर्मचारी व अनेक मान्यवर उपस्थित होते. माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल यांच्यासह उद्योगपती स्व. तपनभाई मुकेशभाई पटेल यांनी पटेल परिवाराचा वारसा मोठ्या उमेदीने व जोमाने पुढे नेत तालुक्याच्या विकासात मोठ्या प्रमाणात हातभार लावला होता. तालुक्यासह जिल्हाभरात हजारो युवकांसाठी प्रेरणास्त्रोत बनले होते. काळाने त्यांच्यावर क्रूर आघात केल्याने गेल्या वर्षी ३० सप्टेंबर २०२० रोजी ते आपल्यात राहिले नाहीत. त्यांच्या जन्मदिनी दि. १७ ऑगस्ट २०२३ रोजी दुःखद वातावरणात त्यांचे स्मरण करण्यात आले. त्यांच्या स्मरणार्थ शिरपूर टेक्सटाईल पार्क, दिसान कॅम्पस येथे दिवसभर ७२१ दात्यांनी रक्तदान करुन भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. रक्तदान शिबिरासाठी शिरपूर टेक्सटाईल पार्कचे सर्व संचालक, मुकेशभाई पटेल ब्लड बँक शिरपूर, जीवन ज्योती ब्लड बँक धुळे चे पदाधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी नितीन गावंडे यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे ३७ (१) (३) अन्वये २९ ऑगस्ट,२०२३ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे.

सदरचे आदेश लग्नकार्य, मिरवणुका, तालुका आठवडे बाजार किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूल मध्ये स्वातंत्र्य दिन साजरा

**शिरपूर । प्रतिनिधी**

श्री विलेपार्ले केळवाणी मंडळ संचलित धुळे येथील एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूल मध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

मुख्याध्यापिका सुनंदा मेनन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत, ध्वजगीत गाऊन ध्वजास मानवंदना देण्यात आली. इयत्ता सातवी, आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी मार्चपास्ट सादर करत भारतीय ध्वजाला अभिवादन केले. यातून शिस्त आणि एकतेचे उल्लेखनीय प्रदर्शन पहायला मिळाले. सूत्रसंचालन इयत्ता बारावीतील सृष्टी मोराणकर व दहावीतील वंश हरसोत यांनी केले. मुख्याध्यापिका सुनंदा मेनन यांनी स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देत समता आणि प्रगती या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले. इयत्ता पाचवीतील हिताक्षी वाधवा हिने हिंदी तर इयत्ता सातवीतील आयुषी देवरे यांनी इंग्रजीतून भाषण करून राष्ट्राप्रती एकता आणि जबाबदारीचे महत्त्व पटवून देवून सर्वांना मंत्रमुग्ध केले. देशभक्तीपर गीतावर संगीत व नृत्य सादर करण्यात आले. या उत्सवामुळे शाळेत देशभक्ती आणि अभिमानाची भावना निर्माण झाली. चित्र रेखाटन व लेखन कार्य कलाशिक्षक संजय गलवाडे व वृषाली मांडरे यांनी केले. मुख्याध्यापिका सुनंदा मेनन, उपमुख्याध्यापिका रिचा तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली रजत जैन, विभा पंजाबी, मुनमुन दत्ता, माधव साळवे, विरेंद्र सैदाणे, संकेत रुद्र, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.



# आर. सी. पटेल महाविद्यालयात रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जनजागृती

**शिरपूर । प्रतिनिधी**

येथील आर. सी. पटेल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जनजागृती करण्यात आली. प्रादेशिक परिवहन विभाग धुळे, राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान यासंदर्भात धुळे येथील मोटर वाहन निरीक्षक विनोद हिरे व मोटर वाहन निरीक्षक राजेंद्र शिंदे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. ए. एम. पाटील होते.

विनोद हिरे म्हणाले की, स्वतःची सुरक्षा म्हणजे कुटुंबाची सुरक्षा असते, बेजबाबदार वाहन चालविल्याने अपघात होतात. मोटर सायकल चालवताना डोक्यावर हेल्मेट असणे तर चार चाकी वाहन चालवताना चालकांनी सीट बेल्ट लावणे गरजेचे आहे. रवींद्र शिंदे म्हणाले, भारतात दरवर्षी एक लाख तीस हजार अपघात होतात, याला कारण वाहनांचा अधिक वेग होय. या अपघातात ८० टक्के मृत्यू हा १८ ते ३५ वयोगटातील तरुणांचा होतो. त्यामुळे वाहन चालकांनी सिग्नलचा वापर करावा व वाहनांचा वेग मर्यादित ठेवावा. अपघात झाला असल्यास सूज्ञ नागरिकांनी पोलीस स्टेशन व दवाखान्यात अपघातासंबंधीची माहिती द्यावी, त्यामुळे अपघात झालेल्यास वाचविता येऊ शकेल. सूत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय प्रा. रामकुमार सूर्यवंशी यांनी केला. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. डॉ. ए. जी. सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाला भागवत मोटर ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक नरेन्द्र भागवत, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. ए. जे. माहेश्वरी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. राम सूर्यवंशी, प्रा. मानसी वैद्य, प्रा. गोपाल बिडे, प्रा. पियूष सोनार, प्रा. विजय पाटील, प्रा. प्रशांत टोकसा आदि उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणेश सोनार, बंसीभाई चौधरी, हंसराज कढरे, उमेश चौधरी आदिंनी प्रयत्न केले.

# कृषी माध्यमिक विद्यालय होळ येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**होळ । प्रतिनिधी**

कृषी माध्यमिक विद्यालय होळ येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मेरी मिट्टी मेरा देश या अभियान अंतर्गत सलग तीन दिवस दिनांक १३,१४ व १५ ऑगस्ट पर्यंत ध्वजारोहणासहित विविध कार्यक्रम राबविण्यात आले. यामध्ये पंचप्राण प्रतिज्ञा, राज्यगीत, राष्ट्रगीत,तसेच होळ गावात जनजागृती प्रभात फेरी रॅली काढून मेरा भारत महान,जय जवान जय किसान,वंदे मातरम,भारत माता की जय अशा जयघोषित घोषणा देऊन जनजागृती रॅली काढण्यात आली. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी आजादी का अमृत महोत्सव स्वातंत्र्य दिनाचे ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री डी.पी.सिसोदे सर यांनी स्वीकारून कार्यक्रमाला सुरुवात केली.




आयुष्यभर ज्यांनी देशाची सेवा केली असे आजी माझी जवान सैनिक त्यामध्ये माजी सैनिक मनोहर धनराज पाटील, माजी सैनिक श्रीयुत भिलाऊ भुरसिंग महाले, तसेच सध्या सेवेत कार्यरत असणारे आजी सैनिक श्रीयुत भावेश विलास पाटील, कार्यरत जवान सैनिक सुनील जगतराव पाटील तसेच ज्येष्ठ प्रगतशील शेतकरी सखाराम रामचंद्र महाले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुणे आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने आणि विद्यार्थिनी गायलेले ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. आजादी का अमृत महोत्सवाचे स्वातंत्र्य दिनाच्या ध्वजारोहणाचा मान उपस्थित प्रमुख पाहुणे सखाराम रामचंद्र महाले यांच्या हस्ते श्रीफळ अर्पण करून ध्वजारोहण करण्यात आले. व सर्व उपस्थितानी राष्ट्रगीत गाऊन राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. त्यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी होळ गावातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य अंगणवाडी सेविका आशा वर्कर वैद्यकीय सेवेतील डॉक्टर नर्स व विविध क्षेत्रातील पदाधिकारी जेष्ठ वरिष्ठ गावाचे नागरिक उपस्थित होते. स्वातंत्र्य दिनानिमित्त शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी देशभक्तीपर गायन व नृत्य स्पर्धेचे विद्यालयातील शिक्षिका सी.ए.पाटील यांच्या मार्गदर्शनाने देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.त्यामध्ये सर्वांचे लक्ष गायन व नृत्य स्पर्धा आणि देशभक्तीपर वेशभूषा स्पर्धेने वेधले.वेशभूषा स्पर्धेमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी विविध स्वातंत्र्यसेनानी यांच्या वेशभूषा केल्या होत्या. त्यानंतर कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख पाहुणे आणि मुख्याध्यापक यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व व स्वातंत्र्य मिळण्यासाठी स्वातंत्र्यसेनानी चे योगदान याविषयी मार्गदर्शक भाषणे दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयातील शिक्षक श्रीयुत वाय जी सोनवणे यांनी केले. विविध स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या द्वारे पुरस्कार व प्रशस्तीपत्रक वितरित करण्यात आले.

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# विचारवंत प्रा. नरके यांच्या श्रद्धांजली सभेत मंत्री भुजबळांना अश्रू अनावर































मुंबई । ज्येष्ठ

विचारवंत साहित्यिक प्रा.हरी नरके यांच्या निधनाने माझा वैचारिक आधारस्तंभ हरपला असल्याच्या शोकभावना व्यक्त करतांना राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष छगन भुजबळ यांना अश्रू अनावर झाले. यावेळी 'हरी तुला आम्ही तुला मरू देणार नाही, तू सुरु केलेलं काम आम्ही नेटाने पुढे नेऊ' अशा शोकसंवेदना त्यांनी व्यक्त केल्या. ज्येष्ठ विचारवंत प्रा.हरी नरके यांचे दि.९ ऑगस्ट रोजी दु:खद झाले. त्यांच्या निधनामुळे त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी समता परिषदेच्या वतीने मुंबई एज्युकेशन ट्रस्ट, भुजबळ नॉलेज सिटी, बांद्रा मुंबई येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेस सामाजिक, साहित्य, सांस्कृतिक, पत्रकारिता, कला आदी क्षेत्र यांसह सर्वपक्षीय राजकीय मान्यवरांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी प्रा.हरी नरके यांच्या पत्नी संगीता, मुलगी प्रमिती व नरके कुटुंबीय, माजी खासदार समीर भुजबळ, माजी आमदार पंकज भुजबळ यांच्यासह संपूर्ण भुजबळ कुटुंबीय, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी हरीच्या खांद्यावर बसून जाण्याचे आमच वय होत. परंतु तो आमच्या खांद्यावर जाण्याची वेळ आली याचं मोठ दु:ख आहे अशा भावना ज्येष्ठ साहित्यिक रावसाहेब कसबे यांनी उपस्थित न राहू शकल्याने ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांच्याकडून व्यक्त केल्या.प्रा. नरके यांच्या जाण्याने आमचा मार्गदर्शक हरपला अशा शोकभावना आमदार महादेव जानकर यांनी व्यक्त केल्या. यावेळी आ. सचिन अहिर, माजी आमदार तुकाराम बिडकर, सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन वैद्य, माजी सनदी अधिकारी महेश झगडे, ज्येष्ठ सनदी अधिकारी भूषण गगराणी, ज्येष्ठ पत्रकार प्रताप आसबे, प्रा.अर्जुन डांगळे, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शोकभावना व्यक्त करत आदरांजली व्यक्त केली.

संकलन : प्रमोद शिंपी

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# सत्ताधाऱ्यांच्या हलगर्जी पणामुळे धुळेकर पाण्यापासून वंचित : आमदार शाह

















धुळे । धुळेकरांचा पाणीप्रश्न कायमचा सुटावा यासाठी शासनाने अक्कलपाडा योजना मंजूर करून भरीव निधी उपलब्ध करून दिला आहे. मात्र, निव्वळ मनपा सत्ताधार्यांच्या दुर्लक्षामूळे धुळेकर पाण्यापासून वंचित राहिल्याची टीका आ.फारुख शाह यांनी अक्कलपाडा योजना पाहणी दौर्याप्रसंगी केली. धुळेकर नागरिकांना एक दिवसाआड नियमित पाणी मिळावे यासाठी गेल्या वर्षभरापासून धुळे महापालिकेचे सत्ताधारी आश्वासन देत होते. मात्र, प्रत्यक्षात योजनेचे काम कुठवर आले याबाबतची सत्यपरिस्थिती सातत्याने लपवली जात होती. ही महत्त्वाची बाब धुळेकर जनतेला कळावी म्हणून आ. फारुख शाह यांनी पहाणी दौर्याचे आयोजन केले होते. प्रत्यक्ष पहाणी केल्यानंतर सत्ताधार्यांनी आतापर्यंत केलेली लपवा लपवी प्रकर्षाने लक्षात आली. प्रकल्पातून पाणी उचलण्यासाठी आवश्यक असणारा वीज पुरवठा करणेसाठी उशिराने ३३ केव्ही सबस्टेशन उभारण्याचे नियोजन केले जाते. ही बाब एकूणच विचार करायला लावणारी आहे. योजना पूर्ण झाली म्हणून चार महिन्यांपूर्वी एकमेकांना पेढे भरविणारांची अवस्था म्हणजे नवरदेवाला लग्नासाठी बोहल्यावर चढवायचे आणि मंडपातून नवरी गायब अशी झाली असल्याची खरमरीत टीकाही आ.शाह यांनी यावेळी केली. तसेच ३३ केव्ही सबस्टेशन येत्या पंधरा दिवसात कार्यान्वीत करून तीनही पंप चालू करण्यात यावे, असे आदेश मनपा, मजीप्रा आणि वीज वितरण कंपनीच्या आधिकार्यांना आदेश दिलेत. जेणेकरुन धुळेकर नागरिकांना किमान दोन दिवसाआड पाणी देता येईल. तसेच यापूर्वी महापालिकेने मागणी केल्यानुसार जलकुंभांचे छत, शहरातील वितरण व्यवस्था सक्षम करण्यासाठी व्हॉल्व, काही ठिकाणी नवीन पाईपलाईनसाठी राज्य शासनाकडून ५ कोटी उपलब्ध करून देण्याचे आ.फारुख शाह यांनी जाहीर केले. वितरण व्यवस्था सक्षम झाली म्हणजे एकदिवसाआड पाणी देणे सुलभ होईल. अक्कलपाडा योजना पहाणी दौर्याप्रसंगी आ.फारुख शाह यांच्यासोबत डॉ. दीपश्री नाईक, नगरसेवक नासिर पठाण, नगरसेवक सईद बेग, प्यारेलाल पिंजारी, डॉ.बापूराव पवार, कैसर अहमद, असद अन्सारी, जावेद मिर्जा, आसिफ मुल्ला, असिफ शाह, इब्राहिम पठाण, फिरोज शाह, शब्बीर शाह, समीर शाह, सलमान पिंजारी, महापालिकेचे उपायुक्त विजय सनेर, अभियंता कैलास शिंदे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे कार्यकारी अभियंता श्री.वानखेडे, वीज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता श्री. भामरे आदी उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ